# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ६९५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २२/१०/२०१६

**१) अवैद्यरित्या ४ ब्रास रेती चोरी करतांनी मिळुन येताच व रेती खाली करुन पुरावा नष्ट करण्याच्या उद्येशाने पळुन गेल्याने गुन्हा नोंद. :-**

दिनांक २१/१०/२०१६ रोजी १२.२० वा. दर. यातील फिर्यादी जयंत हिरामन सोनवाने वय ४० वर्ष, रा. मंडळ अधिकारी शहापुर हा अवैद्यरेती वाहतुक व उत्खन्न वाहन तपासनी पथका सोबत पाहणी तपासनी करीत असतांनी यातील आरोपी चालकाने आपल्या ट्रॅक्टर मध्ये अवैद्यरित्या चोरीची अंदाजे ४ ब्रास रेती कि. ८,०००/-रु. चोरी करुन वाहतुक करतांनी मिळुन आला व रेती खाली करुन पुरावा नष्ट करण्याच्या उद्येशाने पळुन गेल्याने फिर्यादींचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ३७९,२०१ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. पाटील पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

**२) अनोळखी इसमाने मोबाईलवर एटीएम नं. मागुन पैसे डेबीट करुन फसवणुक केली . :-**

दिनांक २९/०९/२०१६ रोजी १४.५३ ते १७.०० वा ते दिनांक ०८/१०/२०१६ चे ०९.४९ ते १०.०० वा. दर. यातील फिर्यादी हा सनफ्लॅग मध्ये नौकरीवर असुन त्याचे पगार खाते बॅक ऑफ इंडीया वरठीच्या खात्या मध्ये असुन फिर्यादीच्या मोबाईलवर अनोळखी इसमाने फोन करुन बॅक मैनेजर असल्याची बतावनी करुन फिर्यादीस त्याचा आधार कार्ड क्र. व एटीएम नं. मागुन फिर्यादीचे रक्कमेतुन १३,३१०/-रु. डेबीट करुन फसवणुक केल्याने फिर्यादी रोहिदास गणपत पवार वय ५५ वर्ष, रा. शास्त्री वार्ड वरठी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ४१९,४२०भादंवि. सहकलम ६६(सी), ६६(डी) माहिती तंत्रज्ञान अधि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. नागरे पो. स्टे. वरठी हे करीत आहेत.

**३) अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद. :-**

दिनांक २१/१०/२०१६ रोजी १६.०० वा. दर. यातील फिर्यादी ही शाळेला सुटटी झाल्या नंतर फिर्यादी ही सायकलने घराकडे जात असतांना आरोपीने त्याचे कडे असलेल्या मॅस्ट्रो मोपेड ने पाठलाग करुन तुझ्याशी बोलायचे आहे असे बोलुन आरोपीने फिर्यादीचे घरापर्यत पाठलाग करुन फिर्यादीचा विनयभंग केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३५४(ड) भांदवि. सहकलम १२ बा. लै. अ. का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. गायकवाड पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**४) अवैध दारु/जुगार अडयांवर धाडी . :-**

दिनांक २१/१०/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. भंडारा, लाखनी, पालांदुर व पवनी येथील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०५ गुन्हे दाखल करुन आरोपीतांच्या ताब्यातुन २९ लिटर हातभटटी दारु कि. २,७८०/-रू. व २ लिटर ५२० मिली देशी/विदेशी + स्कुटी कि. १०,८००/-रु. तसेच जुगारातुन कि. ३२३/-रू. असा एकुण कि. १३,९०३/-रू. चा माल जप्त करण्यात आला आहे.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५१०११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.